

गायन करताना चंद्रशेखर पाठक व बालगायिका शुभलक्ष्मी

# चंद्रशेखर व शुभलक्ष्मीच्या भक्तिमय गीत गायनाने श्रोते झाले मंत्रमुग्ध

तभा वृत्तसेवा
यवतमाळ, ९ मार्च

भगवान श्रीरामकृष्ण यांच्या जयंती उत्सवानिमित्त २३ फेब्रुवारीपासून सुरू असलेल्या विविधांगी कार्यक्रमातील विशेष आकर्षण श्रीरामकृष्ण आश्रमात पार पडले. चंद्रशेखर पाठक, बालगायिका शुभलक्ष्मी कुळकर्णी यांच्या हृदयस्पर्शी, मधुर आवाजात भक्ती संगीतमय सादरीकरणाने सर्वांना मंत्रमुग्ध केले.

या भक्ती संगीतमय कार्यक्रमात गायक चंद्रशेखर पाठक, बालगायिका शुभलक्ष्मी कुळकर्णी, जयंत कर्णिक, प्रसाद कुळकर्णी, अरविंद पुनवटकर, नरेश देशमुख, आश्रमाचे अध्यक्ष अरविंद सरमुकदम, उपाध्यक्ष अरविंद डगावकर उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने संगीतमय पुष्प समर्पित करण्यात आले.

त्यानंतर उपस्थित गायक-वादक वृंदांचे पुस्तक व पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. आपल्या मधुर व मंजुळ आवाजातून बालगायिका शुभलक्ष्मी कुळकर्णी यांच्या 'ओंकार प्रधान रूप गणेशाचे' या भक्तिगीताने स्वरांजलीला प्रारंभ झाला.

त्यानंतर चंद्रशेखर पाठक यांनी भक्तिगीतातून रसिक मनावर छाप पाडली. अतिशय सुमधुर आणि मनाचा वेध घेत एकापेक्षा एक सरस गीत या चमूंनी सादर करून भक्तांच्या हृदयाचा ठाव घेतला. जयंत कर्णिक यांनी दिमाखदार शैलीतून या कार्यक्रमाचे निवेदन केले.

संचालन व आभार निखिल डगावकर यांनी केले. या कार्यक्रमाला भक्तसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतरच्या अंतिम पुष्पात 'भगिनी निवेदिता : एक राष्ट्र समर्पित' या विषयावर अरविंद सरमुकदम यांचे व्याख्यान होणार आहे.

सर्व भक्तांनी उपस्थित राहून कृपाशीर्वाद ग्रहण करावा, असे आवाहन श्रीरामकृष्ण आश्रमचे अध्यक्ष अरुण सरमुकदम, उपाध्यक्ष अरविंद डगावकर, सचिव प्रवीण चंदाराणा तसेच आश्रमचे पदाधिकारी व भक्तसमुदायांनी केले आहे. 20

NADcegal

# रामकृष्ण आश्रमामध्ये पुस्तक प्रदर्शनीचे उद्घाटन



रामकृष्ण आश्रमात भरविण्यात आलेली पुस्तक प्रदर्शनी.

प्रतिनिधी । यवतमाळ

येथील सुप्रसिद्ध आध्यात्मिक केंद्र श्री रामकृष्ण येथील आश्रमात श्रीरामनवमीचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये भजन, रामरक्षा स्तोत्र, मंगलआरती, रामनाम संकीर्तन इ. या श्रीरामनवमी समारोहाला आश्रमचे उपाध्यक्ष अरविंद डगावकर, प्रभाकर पराते, अशोक चव्हाण, शामलाल गुप्ता, देवकुमार खंडेलिया, ज्ञानेश्वर कोरे, डॉ. अशोक चौधरी, संभाजी झाडे, नितिन फरकुंडे, महेश डाहाके, आकाश खडसाळकर, गुप्ता, कर्णेवार, जोशी, झाडे, चव्हाण, या समस्त भगिनी मंडळ उपस्थित होते.

सर्वप्रथम भजन व महाआरती नंतर श्री रामकृष्ण आश्रमाचे उपाध्यक्ष अरविंद डगावकर यांचे हस्ते फीत कापून आश्रम येथे स्थापन करण्यात आलेल्या विवेकानंद साहित्याचे पुस्तक प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. समस्त भक्तांनी या प्रदर्शनीला भेट देऊन विविध पुस्तकांची पाहणी केली. या साहित्याच्या अध्ययनातून व्यक्तिमत्व घडविण्यास चांगला फायदा होईल, असे प्रतिपादन व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन महेश डाहाके यांनी केले.

श्रीरामनवमी सोहळ्याच्या यशस्वितेसाठी श्री रामकृष्ण आश्रमाचे अध्यक्ष अरुण सरमुकदम, उपाध्यक्ष अरविंद डगावकर, सचिव प्रविण पंदाराणा, निखिल डगावकर, तसेच आश्रमाचे पदाधिकारी, भक्त समुदाय यांच्या मार्गदर्शनात कपिल शर्मा, नितिन टेकाम तथा विद्यार्थी प्रतिनिधींनी सहकार्य केले. ही प्रदर्शनी सर्वांकरीता खुली करण्यात आली आहे. सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आश्रमच्या विश्वस्तांनी केले आहे.

SHRI RAMAKRISHNA ASHRAM

President Secretary Treasurer

# श्रीरामकृष्ण आश्रमात रामकृष्ण परमहंस, भगिनी निवेदिता जयंती

## भक्ती संगीत, मंगल आरती, भक्तांची मांदियाळी

प्रतिनिधी । यवतमाळ

प्रपंचातून परमार्थ साधत ईश्वरभक्तीचा संदेश देणारे, सर्व धर्मांच्या आराधनेतून एकच ईश्वराचा बोध संपूर्ण विश्वाला करून देणारे भगवान श्री रामकृष्ण परमहंस यांची तिथीनुसार १८२ वी व भगिनी निवेदिता यांची १५० वी जयंती जामनकर स्थित रामकृष्ण आश्रम येथे मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रमाद्वारे साजरी केल्या गेली.

या जयंती उत्सवाची सुरूवात दि. २३ फेब्रुवारीपासून प्रवचनमालेने झाली. त्यामध्ये दि. २३ रोजी द. तु. नंदापुरे व प्रा. दिनकर वानखडे यांचे श्रीरामकृष्ण व सर्वधर्म समभाव या विषयावर दि. २४ रोजी निखिल डगावकर व डॉ. ललिता घोडे, डॉ. अशोक चौधरी यांचे विशुद्ध मातृत्व या विषयावर, दि. २५ रोजी प्रा. डॉ. प्रदीप झिलपिलवार, बाळासाहेब सरोदे यांचे स्वामी विवेकानंद आणि युवक या विषयावर व दि. २७ रोजी अरविंद सरमुकदम, अरविंद डगावकर यांचे 'भगिनी निवेदिता-एक राष्ट्र समर्पित जीवन' या विषयावर प्रवचन झाले.

दि. २६ रोजी चंद्रशेखर पाठक व सौ. लक्ष्मी कुळकर्णी यांचा भक्ती संगीतमय कार्यक्रम भक्तांचे मन रिझवून गेला. रामकृष्ण परमहंस जयंती निमित्य भक्तीमय अश्या सोहळ्याचे आयोजन



रामकृष्ण आश्रमामध्ये रामकृष्ण परमहंस जयंती साजरी केली.

दि. १८ फेब्रुवारी मंगळवारला करण्यात आले. यामध्ये पहाटेपासून मंगल आरती, पुजा, भजन, श्रीरामकृष्ण अष्टपत्तोत्तर नामावली, महाप्रसाद व संध्या आरती नंतर श्री रामकृष्ण नाम संकीर्तन पार पडले. याप्रसंगी जीवन विकास मासिक तथा रामकृष्ण -विवेकानंद साहित्य विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. या जयंती उत्सवात भक्तांची मांदियाळी जमली होती.

या प्रवचन कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार निखिल डगावकर, महेश डाहाके यांनी केले. या सोहळ्याच्या यशस्वितेसाठी श्रीरामकृष्ण आश्रमाचे अध्यक्ष अरूण सरमुकदम, उपाध्यक्ष अरविंद डगावकर, सचिव प्रविण चंदाराणा, तसेच आश्रमचे पदाधिकारी व भक्त समुदाय, विद्यार्थी प्रतिनिधी आकाश खंडाळकर यांनी परिश्रम घेतले.

SHRI RAMAKRISHNA ASHRAM

NADegal

President Secretary Treasurer

# रामकृष्ण आश्रमात भजनसंध्या



भजन सादर करताना अंजली सकरकर, दत्ता देशपांडे

प्रतिनिधी

…, १ जानेवारी

विविध सामाजिक कार्यासाठी प्रसिद्ध श्रीरामकृष्ण आश्रमतर्फे … येथील श्रीरामकृष्ण आश्रमात माँ शारदा यांच्या १६१ व्या जयंतीनिमित्त भक्तिमय भजनसंध्या उत्साहात पार पडली.

यावेळी माँ शारदा मंडळाच्या अंजली सकरकर, मीरा काळे, श्रीरामकृष्ण आश्रमचे अध्यक्ष अरुण हरमुकदम, उपाध्यक्ष आशिष इनामदार, सचिव प्रवीण चंदाराणा, विनोद देशपांडे, संगीतकार दत्ता देशपांडे, तबलजी विनोद महाजनी, आश्रमाचे पदाधिकारी व भक्तसमुदाय उपस्थित होता. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते रामकृष्ण परमहंस, माँ शारदा आणि स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले.

त्यानंतर प्रमुख अतिथींचे स्वागत करण्यात आले. आपल्या मधुर स्वरात माँ शारदा यांच्यावर आधारित देवी भक्तिगीते व भजन सादर करून अंजली सकरकर व दत्ता देशपांडे यांनी वातावरण भक्तिमय केले. भजनसंध्येचे संचालन मीरा काळे यांनी, तर आभारप्रदर्शन निखिल इनामदार यांनी केले. कार्यक्रमासाठी सर्व भाविकांनी परिश्रम घेतले.

# रामकृष्ण आश्रम येथे आजपासून योगसाधना, नॅचरोपॅथी शिबिर

यवतमाळ । विविध सामाजिक कार्यासाठी प्रसिद्ध असलेले श्रीरामकृश्ण आश्रम यांच्या उपक्रमातून जामनकर नगर येथील श्री रामकृष्ण आश्रम येथे सुदृढ तथा निरोगी आरोग्याच्या दृष्टीने मोफत योगसाधना ,होमिओपॅथी, तथा नॅचरोपॅथीचे शिबिर घेण्यात येणार आहे. दि.१७ जानेवारी पासून या योगसाधना शिबिराचा आरंभ श्रीरामकृष्ण आश्रममध्ये सकाळी ६.३० ते ७.३० या कालावधीत दैनंदिन रूपात होणार आहे.या प्रसंगी योग,होमिओ तथा नॅचरोपॅथीतज्ञ डॉ.वासुदेव कमळे सर्वांना सृदृढ आरोग्याबददल मार्गदर्शन करणार आहे. सदर पिबीर हे पुर्णतः मोफत असून यात सर्व आजारांवर उपचारपद्धतीबाबत सल्ला देण्यात येतील.

NADeogade

President Secretary Treasurer

# स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रम

## रामकृष्ण आश्रम येथे व्हॉलिबॉल सामने, परिसंवाद, विविध उपक्रम

सकाळ वृत्तसेवा

यवतमाळ, ता. १५ : आपल्या अलौकिक आध्यात्मिक शक्तीने संपूर्ण विश्वभर भारतीय वैदिक तत्त्वज्ञान प्रसारित करणाऱ्या थोर युवा संन्यासी स्वामी विवेकानंद यांची १५८ वी जयंती रामकृष्ण मिशनद्वारे श्रीरामकृष्ण आश्रम जामनकर नगर येथे, रविवार (ता. ३१) होत आहे. यावेळी विविध सामाजिक उपक्रम घेण्यात येणार आहे.

जयंती उत्सवाच्या पूर्वदिनी विवेकानंद वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे सकाळी व्हॉलिबॉलचे सामने होणार असून, याच दिवशी सायंकाळी साडेचारला स्वामी विवेकानंद यांच्या जीवनचरित्र कार्यावर ॲड. जयंत नंदापूरे व अमित सरोदे यांचा परिसंवाद होणार आहे. जयंतीदिनाची सुरुवात पहाटे मंगल आरती, स्तोत्रपाठाने होणार असून, भजनानंतर महाप्रसाद वितरित होणार आहे. सायंकाळी



संग्रहित छायाचित्र

संध्याआरतीनंतर शिवमान संकीर्तन गायले जाणार आहे. याप्रसंगी स्वामी विवेकानंद यांची साहित्य विक्रीसाठी उपलब्ध असणार आहे. जयंती सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीकृष्ण आश्रमचे अध्यक्ष अरुण सरमृकदम, उपाध्यक्ष अरविंद डगावकर, सचिव प्रवीण चंदाराणा तसेच आश्रमचे पदाधिकारी व भक्त समुदाय यांनी केले आहे.

दै. सकाळ दि. १६ जाने

NADegal